# <u>निवेदन</u>

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या मिळकतींच्या अधिकार अभिलेखात वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे व इतर हक्क सदरी वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद घेण्याबाबत

- महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उताऱ्यावर तसेच नागरी भागातील वक्फ मिळकतींच्या अभिलेखांमध्ये भोगवटादार व इतर हक्क सदरी घ्यावयाच्या नोंदींच्या संदर्भात क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

  **(१)** राज्यातील वक्फ मालमत्तांच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उताऱ्यावर यापुढे नोंद घेतांना भोगवटादार सदरी फक्त संबंधित **"वक्फ संस्थेचे नाव"** यांची नोंद घेण्यात यावी. त्याशिवाय अन्य कोणाच्याही नावांच्या नोंदी असू नयेत.

  **(२)** त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या बाबतीत गा.न.नं. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क सदरी "**वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार**" अशी नोंद घेण्यात यावी.

  **(३)** महाराष्ट्र राज्यातील वक्फ मालमत्तांच्या बाबतीत कोणत्याही परिस्थितीत मुतवल्लीचे वा इतर कोणत्याही खाजगी इसमांचे नाव अधिकार अभिलेखात नोंदविण्यात येऊ नयेत. अशी नावे आधीपासून अधिकार अभिलेखात अस्तित्वात असल्यास, ती महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, आणि वक्फ अधिनियम, १९९५ व संबंधित नियमातील तरतूदींचा अवलंब करुन विहित प्रक्रियेद्वारे आवश्यक तेथे सर्व हितसंबंधितांना सुनावणीची संधी देऊन भोगवटादार सदरी संबंधित "**वक्फ संस्थेचे नाव**" आणि

इतर हक्क सदरी "**वक्फ प्रतिबंधित  सत्ता प्रकार**" अशी नोंद घेण्याकामी कायद्यातील तरतूदीनुसार सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

**(४)** नागरी भागातील वक्फ मिळकतीच्या बाबतीतही संबंधित वक्फ मालमत्तेच्या अधिकार अभिलेख्यांमध्ये (म्हणजेच प्रॉपर्टी कार्ड मध्ये) भोगवटादार सदरी संबंधित "**वक्फ संस्थेचे नाव**" आणि इतर हक्क सदरी "**वक्फ प्रतिबंधित  सत्ता प्रकार**" अशी नोंद घेण्याकामी कायद्यातील तरतूदीनुसार सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

**(५)** सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी तसेच जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख यांनी सदर निर्देशांची अंमलबजावणी करीत असताना भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर किंवा भाडेपट्ट्यावर शासनाकडून देण्यात आलेल्या मूळ शासकीय जमिनी वक्फ करण्यात आल्याचे आढळून आल्यास अशा प्रकरणी शासनाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

******_******